# काव्यकुंज



## जाणिव आपली आपली

दिवाणखान्यात टी.व्ही. आल्यापासुन, मी बोलणे विसरलो आहे.
दारात गाडी आल्यापासुन मी, चालणे विसरलो आहे.
खिश्यात कॅल्क्युलेटर आल्यापासुन, मी पाढे म्हणणे विसरलो आहे.
ए. सी. ऑफीसमध्ये ऐटीत बसून, झाडाखालचा गारवा विसरलो आहे.
रस्त्यावर डांबर आल्यापासुन, मातीचा सुवास विसरलो आहे.
मनाला इतके श्रम होतात, त्यात शरीराचे कष्ट विसरलो आहे.
कचकड्यांची नाती जपताना, प्रेम करायला विसरलो आहे.
बँकेतील खाती सांभाळताना, पैशांची किंमत विसरलो आहे.
उत्तेजक चित्रांच्या बरबटीमुळे, सौदर्य पाहणं विसरलो आहे.
सुगंधी सेन्टच्या वासांमुळे, फुलांचा सुगंध विसरलो आहे.
फास्ट फुडच्या जमान्यात, तृप्तीचा ढेकर विसरलो आहे.
पॉप - रॉकच्या दणदणाटात संगीत, समाधी विसरलो आहे.
क्षणभंगुर मृगजळांमागे धावतांना, सत्कर्मातला आनंद विसरलो आहे.
माझीच तुंबडी भरतांना, दुसऱ्यांचा विचार करणं विसरलो आहे.
सतत धावत असताना, क्षणभर थांबणे विसरलो आहे.
जागेपणीच सुख जाऊद्या, सुखानं झोपणेही विसरलो आहे.
साधनां सारखे विनोदही कृत्रिम, खळखळून हसणं ही विसरलो आहे.
आणि हसणं विसरल्यानं, जीवनच जगणं विसरलो आहे.

**राजेंद्र भंडारी**
विभागीय लेखापाल,
मुख्य कार्यालय, मुंबई

## ।। आस पावसाची ।।

विनवनी पावसाले, हात जोडुनीया करी
पाउस पडु दे देवा, बाप म्हणे शेतकरी
ढगं आलं गेलं भरुन, वीज चमकली थोडी
बिजबियाणं आणलं, उदार बैल-जोडी ....
बायकापोरबी आली, अर्ध उपाशी राहून
पेरा कपाशीच वाण, दाण तिफनी टाकुन
गरीबाच सपान गडया, करत कायले खोडी
बिजबियाणं आणलं, उदार बैल-जोडी....
आलं डोयाले पाणी, तुही वाट रे पाहुन,
घेतो कायले परिक्षा, दुर अभायी राहुन
दया गरीबाची तुले, लाज येऊ दे रे थोडी
बिजबियाणं आणलं, उदार बैल-जोडी....
आता जर नाही आला, घालीन तुले साकडं
तुहयासंग करीन, साऱ्या जन्माचं वाकडं
कर्ज मांगल फेडीन, आस तुहयावर वेडी
बिजबियाणं आणलं, उदार बैल-जोडी....
बरस-बरस रे राजा, मनापासुन एकदाचा
काळयाआईची शपथ, घास खाईन सुखाचा
ओल्या मिठासंग लागे, आज भाकरीले गोडी
बिजबियाणं आणलं, उदार बैल-जोडी....

**राजेश अंबादास पवार**
उच्चस्तर लिपिक
पारस औ.वि.केंद्र